‘श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा, टप्पा-२’ विकास आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०२३/प्र.क्र.९९/का.१४४४-अ/ई-८६४९६०**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १७ सप्टेंबर, २०२६**

<u>वाचा</u> : १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०४ जून, २०१५.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक १९ जुलै, २०१६.
३) नियोजन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२२.
४) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०२३/प्र.क्र.९९/का.१४४४-अ, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३.
५) जिल्हाधिकारी, हिंगोली यांची दिनांक १२ जून, २०२६ व दिनांक ०२ जुलै, २०२६ रोजीची पत्रे.
६) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२, दिनांक १६ जुलै, २०२६
७) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०२६/प्र.क्र.२९/का.१४४४-अ/ई-१६७७२४२, दिनांक २२ जुलै, २०२६
८) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ जून, २०२६ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीचे इतिवृत्त.
९) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ ऑगस्ट, २०२६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना :</u>

नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०४ जून, २०१५ अन्वये राज्यातील तीर्थक्षेत्र, पर्यटनस्थळ परिसर विकास आराखडा अंतिम करणे व अंमलबजावणीसाठी धोरण / मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत. तसेच दिनांक १९ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये यातील काही तरतूदी/निकष याबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

०२. नियोजन विभागाच्या वाचा क्र.४ येथील शासन निर्णयान्वये श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास (रूपये १५.२१ कोटी) प्रशासकीय मान्यता देण्यात

आली असून सदर आराखड्यांतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. उपरोक्त वाचा क्र.५ येथील पत्रांन्वये जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा टप्पा-२ चा प्रस्ताव सादर केला आहे.

०३. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ जून, २०२६ रोजी संपन्न झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. उच्चाधिकार समितीने काही निर्देश देऊन सदर प्रस्ताव राज्यस्तरीय शिखर समितीसमोर सादर करण्याची शिफारस केली.

०४. मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक २७ ऑगस्ट, २०२६ रोजीच्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत रूपये १७८,३४,२०,४७४/- किंमतीचा 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला. राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत सदर विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार प्रस्तुत आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या प्रस्तावित रूपये १७८,३४,२०,४७४/- (अक्षरी रूपये एकशे अठ्ठ्याहत्तर कोटी चौतीस लक्ष वीस हजार चारशे चौऱ्याहत्तर फक्त) किंमतीच्या आराखडयास प्रस्तुत शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

०२. प्रस्तुत विकास आराखडयाअंतर्गत खालीलप्रमाणे कामांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करून घेण्यासाठी जिल्हाधिकारी, हिंगोली यांना 'संनियंत्रण अधिकारी' म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना 'संनियंत्रण अधिकारी' म्हणून जबाबदारी पार पाडण्याकरिता स्वतंत्र कर्मचारीवृंद उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

(१) सदर विकास आराखडयाअंतर्गत शासन निर्णयासोबतच्या 'परिशिष्ट अ' मधील कामे राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत केलेल्या सादरीकरणानुसार निश्चित करण्यात आलेल्या अंमलबजावणी व कार्यान्वयीन यंत्रणांकडून विहित कालमर्यादेत पूर्ण करून घेण्याची जबाबदारी 'संनियंत्रण अधिकारी' म्हणून जिल्हाधिकारी, हिंगोली यांची राहील.

(२) सदर विकास आराखडयामध्ये रूपये १७८,३४,२०,४७४/- किंमतीच्या मान्यता प्राप्त कामांव्यतिरिक्त कोणत्याही कामांचा समावेश करण्यात येऊ नये.

(३) टप्पा-१ च्या आराखडयातील कामांची द्विरुक्ती 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयामध्ये होणार नाही व अशी कामे कोणत्याही अन्य शासकीय योजनेत प्रस्तावित किंवा मंजूर अथवा प्रगतीत नाहीत, ह्याची खातरजमा करण्याची जबाबदारीसुद्धा 'संनियंत्रण अधिकारी' म्हणून जिल्हाधिकारी, हिंगोली यांची राहील.

**(अ) आराखड्यासाठी आवश्यक परवानग्या प्राप्त करून घेणे :-**

(१) 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयातील कामांपैकी ज्या कामांकरिता 'वन (संवर्धन) कायदा, १९८०' अंतर्गत पूर्वपरवानग्या आवश्यक असतील त्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विभाग/ कार्यालय/ प्राधिकरणाकडून वेळेत मान्यता प्राप्त करून घेण्याची जबाबदारी 'संनियंत्रण अधिकारी' म्हणून जिल्हाधिकारी, हिंगोली यांची राहील.

(२) या विकास आराखडयातील कामे राबविण्यापूर्वी, आवश्यकता असल्यास 'पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६' तसेच 'प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष अधिनियम, १९५८' खाली अनुमती व इतर आवश्यक मान्यता/ आवश्यक ना हरकत परवानगी संबंधित केंद्र व राज्य शासनाच्या विभाग/कार्यालय/प्राधिकरणाकडून घेण्याची जबाबदारी 'संनियंत्रण अधिकारी' म्हणून जिल्हाधिकारी, हिंगोली यांची राहील.

(३) सदर आराखड्यांतर्गत कामांसाठी उपरोक्त कायद्यांव्यतिरिक्त विविध कायद्यातील ज्या ज्या तरतूदी लागू आहेत त्या सर्व तरतूदींची तंतोतंत अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, हिंगोली यांची राहील.

**(ब) आराखड्यातील कामांना तांत्रिक मान्यता घेणे :-**

'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयातील कामे सुरू करण्यापूर्वी संबंधित कामांच्या आराखड्यास व अंदाजपत्रकास निश्चित केलेल्या अंमलबजावणी/कार्यान्वयीन यंत्रणेचे 'सक्षम प्राधिकारी' यांच्याकडून आवश्यकतेनुसार 'तांत्रिक मान्यता' या बाबींची पूर्तता करणे/ विहित कार्यपद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. तसेच ही कामे सुरू करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार, जिल्हा परिषद व नगर पालिका या स्थानिक स्वराज्य संस्था यांची देखील आवश्यक ती मान्यता घेण्यात यावी.

**(क) आराखड्याचे संनियंत्रण व अंमलबजावणीसाठी 'जिल्हास्तरीय समिती' व 'कार्यकारी समिती' गठीत करणे :-**

नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.तीर्थवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०४ जून, २०१५ मधील सूचनांनुसार, राज्यस्तरीय शिखर समितीने मान्यता दिलेल्या 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयाचे अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी मा.पालकमंत्री, हिंगोली जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हास्तरीय समिती' आणि 'जिल्हाधिकारी, हिंगोली तथा संनियंत्रण अधिकारी' यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हास्तरीय कार्यकारी समिती' गठीत करण्यात आली आहे. 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयाचे संनियंत्रण व अंमलबजावणी करण्याचे संपूर्ण अधिकार 'जिल्हास्तरीय समिती' यांचे राहतील.

**(ड) आराखड्यासाठी आवश्यकतेनुसार सल्लागार नियुक्त करणे :-**

'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयातील प्रकल्प अहवाल निश्चित केलेल्या कार्यान्वयीन यंत्रणांमार्फत तयार करण्यात यावेत. अत्यंत आवश्यकता असेल तरच, विशिष्ट व तांत्रिक बाबींशी संबंधित कामांसाठी स्वतंत्र व सक्षम सल्लागार याची नियुक्ती करण्याबाबत 'जिल्हास्तरीय समिती' कडून मान्यता प्राप्त करून घ्यावी. असा सल्लागार हा वास्तुरचनाकाराने तयार केलेला आराखडा/ नकाशा यानुसार प्राचीन स्मारके व पुरातत्वस्थळांशी संबंधित कामे स्वतंत्रपणे पूर्ण करण्याची क्षमता व बांधिलकी असलेला असावा. नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागाराकडे अशा प्रकारच्या कामाचा पुरेसा अनुभव असावा. सदर आराखडयाकरिता उपरोक्त प्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागारास वाचा क्र.७ येथील नियोजन विभागाच्या शासन निर्णयामध्ये (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह) नमूद केल्यानुसार सल्लागार शुल्क देय राहील व त्याचा खर्च उपलब्ध निधीमधून करण्यात यावा.

**(इ) आराखड्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची देखभाल दुरुस्ती :-**

प्रस्तुत विकास आराखडयाअंतर्गत निर्माण होणाऱ्या इतर मालमत्तेची देखभाल व दुरुस्तीसाठीची जबाबदारी व यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद संबंधित अंमलबजावणी व कार्यान्वयीन यंत्रणांकडून होणे अपेक्षित असून ती जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील. निर्माण होणाऱ्या अशा मालमत्तेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कोणताही स्वतंत्र निधी नियोजन विभागामार्फत उपलब्ध करून दिला जाणार नाही.

**(ई) आराखड्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांकरिता निधी वितरण : -**

(१) 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयाकरिता शासनाकडून वितरीत होणाऱ्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपद्धतीचे पालन करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत मंजूर/ वितरीत निधीपेक्षा अतिरिक्त खर्च होणार नाही याची 'जिल्हाधिकारी, हिंगोली' यांनी संनियंत्रण अधिकारी म्हणून दक्षता घ्यावी.

(२) या विकास आराखडयाच्या एकूण किमतीच्या मर्यादेत, आराखड्यातील एका मंजूर कामामधील बचत ही त्याच आराखड्यातील मंजूर अधिक खर्चाच्या दुसऱ्या कामाकडे समायोजित करण्याचे अधिकार हे 'सदर बचत झालेल्या कामांसाठी भविष्यात अतिरिक्त निधीची मागणी न करणे', या अटीच्या अधीन राहून 'संनियंत्रण अधिकारी' म्हणून जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी जिल्हास्तरीय समितीकडून पूर्व परवानगी घेऊन करावी व त्याचा अहवाल स्वतंत्रपणे शासनास १५ दिवसात पाठविण्याची दक्षता घ्यावी.

**(उ) आराखड्याशी संबंधित शासनास सादर करावयाची विवरणपत्रे :-**

०१. 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयाच्या निधीमधून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती, तसेच निधीतून होणाऱ्या खर्चाची विवरणपत्रे 'परिशिष्ट ब' मध्ये नमूद केल्यानुसार, कार्यान्वयीन यंत्रणेने दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास न चुकता सादर करावीत. तसेच काम पूर्ण झाल्यावर 'काम पूर्णत्वाचा दाखला' आणि निधीबाबतचे 'उपयोगिता प्रमाणपत्र' न चुकता शासनास सादर करावे. या बाबींकरिता संनियंत्रण अधिकारी यांची जबाबदारी असेल.

**०२. नियोजन विभागाच्या वाचा क्र.६ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील पायाभूत विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र संपत्ती पंजीकरण पद्धती (महासंपत्ती) या पोर्टलवरून युनिक आयडी क्रमांक (MHUID) घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या विकास आराखडयास तात्काळ युनिक आयडी क्रमांक घेण्यात यावा व त्याबाबत शासनास कळविण्यात यावे. तसेच सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व बाबींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.**

०३. जिल्हा नियोजन अधिकारी, हिंगोली यांनी उपरोक्त आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

०४. सदर कामे करताना ऐतिहासिक वास्तूंची मूळ शैली जपण्याचे तसेच पुरातत्वीय जाण असलेल्या संस्थांकडून (भारतीय पुरातत्व विभाग तसेच राज्य पुरातत्वीय विभाग) सदर कामे करुन घेण्यात यावीत. मंदिराच्या बांधकामावरील कृत्रिम रंग काढून टाकण्यात यावा व नैसर्गिक मूळ रंग / बांधकाम जतन करण्यात यावे. तसेच मंदिराच्या मूळ बांधकामातील प्राचिन

शिल्पे ठळकपणे दिसतील याची दक्षता घेण्यात यावी, बांधकाम करताना गुणवत्तापूर्ण साहित्याचा वापर करण्यात यावा. बाह्य विद्युतीकरण व प्रकाशयोजना करताना वीजजोडणी अंतर्गत (concealed) स्वरुपात असावी, या राज्यस्तरीय शिखर समितीने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात यावे.

०५. राज्यस्तरीय शिखर समितीच्या निर्देशानुसार आराखडयांतर्गत सर्व कामे विहित पद्धतीने, गुणवत्तापूर्वक व कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात यावीत.

०६. सदर योजना सन २०२६-२७ या वर्षापासून अंमलात येईल. या आराखडयातील खर्च 'मागणी क्र.ओ-१०, मुख्य लेखाशीर्ष ५४५२, पर्यटनावरील भांडवली खर्च, ०१, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा,१०१-पर्यटन केंद्र, (००) , (००) (१५) तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळ विकास आराखडा (कार्यक्रम/दत्तमत) (५४५२ ०२११)' या लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध तरतूदीतून करण्यात यावा.

०७. 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२' या आराखडयाच्या अंमलबजावणी संदर्भात कार्यवाही करताना मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दिनांक २२ जून, २०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निदेशांचे तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील दिनांक २७ ऑगस्ट, २०२६ रोजी संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत दिलेल्या निदेशांचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी 'संनियंत्रण अधिकारी' म्हणून जिल्हाधिकारी, हिंगोली यांची राहील.

०८. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय शिखर समितीच्या दिनांक २७ ऑगस्ट, २०२६ रोजीच्या बैठकीत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार सदर प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

०९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९१७१४५६१२२७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GEETANJALI
SHRIRAM BAVISKAR

Digitally signed by GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department,
2.5.4.20=A03A9E9727B369EEB75B33D163EE9206A6B63C23E1DB3F22DAFB1DD79B967A3D, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5EAB451FA908D44F55D92D15BD59E941FB8BB2966266D020EB30C8667F18AD4B, cn=GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
Date: 2026.09.17 14:57:50 +05'30'

**(गीतांजली बाविस्कर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत**, तातडीच्या आवश्यक कार्यवाहीकरिता,

जिल्हाधिकारी, हिंगोली.

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, लोकभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. उपमुख्यमंत्री (राऊशु, क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. संसद सदस्य /विधानसभा/ विधान परिषद सदस्य (सर्व)
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व)
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
१२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
१४. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
१५.पोलीस अधिक्षक, हिंगोली
१६.संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई
१७.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर
१८. मुख्याधिकारी, नगर परिषद औंढा (नागनाथ)
१९.जिल्हा नियोजन अधिकारी, हिंगोली
२०.निवड नस्ती (का.१४४४-अ), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

## परिशिष्ट-अ
## 'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२'

(रक्कम रुपये)

| | | |
|---|---|---|
| **(१) पुरातत्व विभागाकडील कामे** | | |
| **अ)** | **संवर्धन आणि जीर्णोध्दार कार्य** | |
| **अ.क्र.** | **कामाचे वर्णन** | **अंदाजित रक्कम** |
| १ | **मंदिराच्या आवारातील वास्तूंचे संवर्धन** | |
| | १) नंदी मंडप<br>२) ओवरी (Ovary's)<br>३) दर्शन बारी ( मंदिराच्या आवारात) | ७,८५,००,०००.०० |
| २ | **हरीहर तलाव आणि परिसरातील मंदिरांचे संवर्धन आणि जीर्णोध्दार** | |
| | हरीहर तलाव | ३५,३२,७८,९४७.०० |
| | कालिका माता मंदिर | ९२,००,०००.०० |
| | श्री महादेव मंदिर (दक्षिण) | ९३,००,०००.०० |
| | गणपती मंदिर | १,००,००,०००.०० |
| | महादेव मंदिर (पश्चिम) | ९९,००,०००.०० |
| | हनुमान मंदिर | ९५,००,०००.०० |
| | महादेव मंदिर (उत्तर) | ९७,००,०००.०० |
| | मंदिराचा चौथरा | २९,००,०००.०० |
| | श्री निळकंठेश्वर मंदिर | ३१,३६,९८५.०० |
| | श्री विसोबा खेचर स्वामी मंदिर | १७,४८,७८६.०० |
| | चिंतामणी मंदिर | २२,४२,७३६.०० |
| | एकूण (२) | ४२,०९,०७,४५४.०० |
| | **एकूण अ (१+२)** | **४९,९४,०७,४५४.००** |
| **ब)** | **औंढा नागनाथ मंदिर परिसरासाठी बाहय विद्युतीकरण, सीसीटीव्ही आणि रोषणाई** | |
| | **विद्युतीकरणाचे काम** | |
| १ | A. पॉवर आणि कंट्रोल केबलिंग कामे :- आर्मर्ड केबल्स, फ्लेक्झीबल केबल, कंट्रोल केबल, DALI केबल, अर्थिंग कंडक्टर्स आणि अर्थ पिट्स | |
| | B. वीज वितरण प्रणाली :- मुख्य LT पॅनल्स, वितरण बोर्ड (DBs), उप-वितरण बोर्ड, MCCBs, ACBs आणि संरक्षण उपकरणे. | |
| | C. C. DG आणि SG सिस्टीम:- DG सिंक्रोनाइझेशन पॅनल्स, AMF पॅनल्स, चेंजओव्हर सिस्टम्स आणि संरक्षण उपकरणे. | |
| | D. UPS बॅकअप सिस्टम्स :- ऑनलाइन UPS, बॅटरी बँक्स, पॉवर कंडिशनिंग उपकरणे. | |

| | | |
|---|---|---|
| | E. सिव्हिल आणि फाउंडेशन वर्क :- खांबांचे फाउंडेशन, DG फाउंडेशन, उपकरणांचे फाउंडेशन. | |
| | F. केबल व्यवस्थापन पायाभूत सुविधा :- केबल ट्रे, रेसवे, DWC पाईप्स, कंड्युट्स आणि उपकरणे. | |
| | G. चाचणी आणि कार्यान्वित करणे :- इन्सुलेशन टेस्टिंग, अर्थिंग टेस्टिंग, लोड टेस्टिंग आणि अंतिम कार्यान्वयन. | |
| २ | **सीसीटीव्ही यंत्रणा** (CCTV System) | १,३८,२६,५०६.०० |
| | A. सर्वीअलन्स कॅमेरे -: बुलेट कॅमेरे, डोम कॅमेरे, पॅनोरामिक कॅमेरे, PTZ कॅमेरे. | |
| | B. AI-आधारित व्हिडिओ व्यवस्थापन प्रणाली :- मध्यवर्ती AI सर्व्हर, व्हिडिओ विश्लेषण सॉफ्टवेअर आणि मॉनिटरिंग प्लॅटफॉर्म. | |
| | C. स्टोरेज इन्फ्रास्ट्रक्चर :- ६०-दिवसांचा व्हिडिओ बॅकअप स्टोरेज, एंटरप्राइझ स्टोरेज सिस्टम्स आणि रिडंडन्सी सोल्यूशन्स. | |
| | D. नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर :- सीसीटीव्ही केबलिंग, फायबर कनेक्टिव्हिटी, पॅच पॅनल्स आणि ॲक्सेसरीज. | |
| | E. नेटवर्क उपकरणे :- मॅनेज्ड PoE स्विचेस आणि वितरण उपकरणे. | |
| | F. मॉनिटरिंग स्टेशन :- एलईडी स्क्रीन्स, मॉनिटरिंग डिस्प्ले, वर्कस्टेशन्स आणि कंट्रोल रूम सेटअप. | |
| | G. इन्स्टॉलेशन आणि कमिशनिंग :- माउंटिंग, कॉन्फिगरेशन, टेस्टिंग आणि ट्रेनिंग. | |
| ३ | **पब्लिक ॲड्रेसिंग सिस्टम** (Public Addressing System) | २१,९३,५२५.०० |
| | A. ॲम्प्लिफिकेशन सिस्टम :- ॲम्प्लिफायर्स, ॲम्प्लिफायर एक्सपँडर्स आणि सिग्नल प्रोसेसिंग उपकरणे. | |
| | B. स्पीकर नेटवर्क: इनडोअर स्पीकर्स, आउटडोअर वेदरप्रूफ स्पीकर्स, सीलिंग आणि वॉल माउंटेड स्पीकर्स. | |
| | C. नियंत्रण उपकरणे :- वॉल्यूम कंट्रोलर्स, पेजिंग कन्सोल आणि झोन कंट्रोलर्स. | |
| | D. केबलिंग इन्फ्रास्ट्रक्चर :- स्पीकर केबल्स, सिग्नल केबल्स आणि कंट्रोल वायरिंग. | |
| | E. इन्स्टॉलेशन आणि कमिशनिंग: ऑडिओ ट्युनिंग, झोन टेस्टिंग आणि सिस्टम इंटिग्रेशन. | |
| ४ | HVAC **सिस्टम** (HVAC System) | ६,७४,६७,७०९.०० |
| | A. VRV/VRF एअर कंडिशनिंग सिस्टम. | |
| | B. इनडोअर युनिट्स :- कॅसेट युनिट्स, डक्टेबल युनिट्स आणि वॉल माउंटेड युनिट्स (जिथे लागू असेल तिथे | |

| | | |
|---|---|---|
| | C. आउटडोअर युनिट्स :- हाय-एफिशियन्सी कंडेन्सिंग युनिट्स आणि कॉम्प्रेसर. | |
| | D. रेफ्रिजरंट पाइपिंग :- कॉपर पाइपिंग, इन्सुलेशन आणि सपोर्ट्स. | |
| | E. ड्रेनेज सिस्टम :- कंडेन्सेट ड्रेन पाइपिंग आणि ॲक्सेसरीज | |
| | F. इलेक्ट्रिकल आणि कंट्रोल वर्क्स :- पॉवर केबलिंग, कंट्रोल केबलिंग आणि सेंट्रल कंट्रोलर्स. | |
| | G. टेस्टिंग आणि कमिशनिंग :- प्रेशर टेस्टिंग, व्हॅक्यूम टेस्टिंग आणि परफॉर्मन्स टेस्टिंग | |
| ५ | **बाह्य आणि वास्तुशिल्प रोषणाई प्रणाली (DALI नियंत्रित)** | |
| | A. मंदिर दर्शनी भाग रोषणाई: संपूर्ण मंदिराच्या बाहेरील दर्शनी भागाच्या रोषणाईसाठी वास्तुशिल्प प्रकाश फिक्स्चर, जे वास्तुशिल्पीय घटक आणि वारसा वैशिष्ट्ये अधोरेखित करतात | |
| | B. मंदिर अंतर्गत रोषणाई :- गर्भगृह, हॉल, अभिसरण जागा आणि इतर अंतर्गत वास्तुशिल्प वैशिष्ट्यांसाठी विशेष प्रकाश फिक्स्चर. | |
| | C. मंदिर परिसर रोषणाई :- आसपासच्या मंदिर परिसरासाठी लँडस्केप आणि पाथवे लाइटिंग, पादचारी हालचालींचे क्षेत्र आणि सार्वजनिक संमेलनाच्या जागा. | |
| | D. दर्शन बारी रोषणाई: पुरेशी रोषणाई, सुरक्षितता आणि वर्धित अभ्यागत अनुभव सुनिश्चित करण्यासाठी दर्शन बारी क्षेत्रासाठी समर्पित प्रकाश व्यवस्था | १४,८७,०६,३५०.०० |
| | E. तटबंदी भिंत रोषणाई :- तटबंदीच्या भिंतींच्या रोषणाईसाठी आणि रात्रीच्या वेळी दृश्यमानता आणि सौंदर्य वाढवण्यासाठी संबंधित संरचनांसाठी वास्तुशिल्प प्रकाश फिक्स्चर | |
| | F. DALI लाइटिंग कंट्रोल सिस्टम :- कंट्रोलर, गेटवे, ड्रायव्हर्स, प्रोग्रामिंग, मॉनिटरिंग आणि सर्व लाइटिंग झोनसाठी शेड्यूलिंग फंक्शन्ससह संपूर्ण DALI-आधारित केंद्रीकृत प्रकाश नियंत्रण प्रणाली | |
| | G. पॉवर आणि कंट्रोल केबलिंग :- पॉवर केबल्स, DALI कम्युनिकेशन्स केबल्स, जंक्शन बॉक्सेस, कंड्युट्स आणि संबंधित वायरिंग इन्फ्रास्ट्रक्चर | |
| | **एकूण ब (१ ते ५)** | **२६,१५,१७,८९९.००** |
| | **लँडस्केप विकास** | |
| | उदयान विकास आणि लँडस्केपिंग **(क)** | ४५,००,०००.०० |
| | **एकूण (१) = (अ + ब + क)** | **७६,५४,२५,३५३.००** |
| | | |
| **(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कामे** | | |
| | **मूळ किंमत** (Project cost A) | |
| १ | मुख्य प्रवेशद्वार + सुरक्षा केबिन = १०० + ३० sq.m | १,०५,००,०००.०० |
| २ | प्रवेशद्वार + पोलिस आणि इन्फॉर्मेशन बूथ = ४१० + ८० sq.m | २,६३,६२,०००.०० |

| | | |
|---|---|---|
| ३ | सामानघर व चप्पल ठेवण्यासाठी जागा | ८६,०८,०००.०० |
| ४ | दर्शन मंडप (या इमारतीत दर्शन रांग, कार्यालय, पास केंद्र, प्रसाधनगृह, सुरक्षा व माहिती केंद्राचा समावेश आहे) | १४,१८,६०,९१६.०० |
| ५ | खान पान केंद्र (दवाखाना) | ४,८०,००,०००.०० |
| ६ | प्रसाधनगृह (बाह्य मार्गाजवळील) | ३,६१,५३,६००.०० |
| ७ | पूजा साहित्य दुकाने (२*२ मी. आकाराची २१ दुकाने) | २३,६७,२००.०० |
| ८ | बाह्य मार्गाजवळील खान पान व इतर वस्तूंची दुकाने (२*२ मी. आकाराची ३५ दुकाने) | १,०१,६८,२००.०० |
| ९ | दर्शनबारी व संलग्न व्यवस्था | |
| | प्रवेश मार्गापासून ते मंदिर प्रकारापर्यंत व नागनाथ कुंडाकडे | १०,१६,८२,०००.०० |
| | ब) उत्तरेकडील दर्शनबारी (VIP) | ४,८९,५८,०००.०० |
| १० | भजन मंडप | १,२९,१२,०००.०० |
| ११ | सुरक्षा भिंत (RCC & MS Steel) | २,६०,८०,०००.०० |
| १२ | परिसर सौंदर्यीकरण (landscape, hardscape, central arena etc.) | |
| | आजूबाजूचे बांधकाम पडल्यानंतर पाणी निचऱ्याच्या व मंदिर प्रकाराच्या मूळ पातळीच्या आवश्यकतेनुसार जमिनीची पातळी बदलणे. | १,९९,०६,०००.०० |
| | दर्शन मंडपामागील आपत्कालीन मार्ग व आवश्यकतेनुसार फरशी बसविणे (दगडी फरशा, ड्रेनेज नियोजनासह) | १५,०६,४०,०००.०० |
| | औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग माहिती परिसर (द्वादश ज्योतिर्लिंग) | ३,४४,३२,०००.०० |
| | हरित कचरा व्यवस्थापन | २५,००,०००.०० |
| | डिजिटल नोटिस बोर्ड किंवा स्मार्ट बोर्ड | २०,००,०००.०० |
| | माहिती फलक | २५,००,०००.०० |
| | सार्वजनिक उद्घोषणा यंत्रणा | १५,००,०००.०० |
| | सुरक्षा कॅमेरे | २०,००,०००.०० |
| | रेन वॉटर हार्वेस्टिंग नियोजन | १०,००,०००.०० |
| | अग्निसुरक्षा व्यवस्थापन | २,७५,००,०००.०० |
| | लँडस्केप वृक्ष लागवडीचे नियोजन | २,९५,९०,०००.०० |
| | बसण्यासाठी जागा, कचराकुंड्या, विश्रांती जागा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, इत्यादी | ५०,००,०००.०० |
| | स्मार्ट लाईट पोल (atleast २५ no., with CCTV camera and public) | २८,७५,०००.०० |
| | परिसर प्रकाशयोजना | ५०,००,०००.०० |
| | **एकूण मूळ प्रकल्प किंमत : "A"** | **७६,००,९४,९१६.००** |
| | Inclusive of other related costs: "B" (अनुषंगिक खर्च) | |
| | आकस्मिक खर्च "A" चे (४%) | ३,०४,०३,७९७.०० |
| | चाचणी आणि गुणवत्ता नियंत्रण शुल्क "A" चे (०.५%) | ३८,००,४७५.०० |
| | रॉयल्टी - "A" चे (१%) | ७६,००,९४९.०० |
| | कामगार विमा - "A" चे (१%) | ७६,००,९४९.०० |
| | वास्तूविशारद शुल्क ( जी. एस.टी. वगळून) "A" चे २% | १,५२,०१,८९८.०० |

| | | |
|---|---|---|
| | किंमतवाढ - "A" चे (५%) | ३,८०,०४,७४६.०० |
| | **एकूण किंमत : "B"** | **१०,२६,१२,८१४.००** |
| | **प्रकल्प किंमत (A + B)** | **८६,२७,०७,७३०.००** |
| | प्रकल्पावर १८% GST | १५,५२,८७,३९१.०० |
| | **प्रकल्पाची पूर्ण किंमत (२)** | **१०१,७९,९५,१२१.००** |
| | **एकूण (१) + (२)** | **१७८,३४,२०,४७४.००** |
| | **एकूण अक्षरी रूपये एकशे अठ्ठ्याहत्तर कोटी चौतीस लक्ष वीस हजार चारशे चौऱ्याहत्तर फक्त** | |

GEETANJALI SHRIRAM BAVISKAR

Digitally signed by GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department, 2.5.4.20=A03A9E9727B369EEB75B33D163EE9206A6B63C23E1DB3F22DAFB1DD79B967A3D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5EAB451FA908D44F55D92D15BD59E941FB8BB2966266D020EB30C8667F18AD4B, cn=GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
Date: 2026.09.17 14:58:18 +05'30'

**(गीतांजली बाविस्कर)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट-ब

‘श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२’

### विवरणपत्र-१ (भौतिक उद्दिष्ट्ये)

| आराखड्यातील एकूण कामांची संख्या | प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या कामांची संख्या | प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाकी असलेल्या कामांची संख्या | कार्यारंभ आदेश देण्यात आलेल्या कामांची संख्या | अंदाजपत्रक स्तरावरील कामांची संख्या | निविदा स्तरावरील कामांची संख्या | पूर्ण झालेल्या कामांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

जिल्हाधिकारी, हिंगोली तथा ‘संनियंत्रण अधिकारी’
‘श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२’

<u>विवरणपत्र- २ (भौतिक उद्दिष्ट्ये)</u>

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची कार्यान्वयीन यंत्रणा | कामासाठी मंजूर निधी | कामासाठी आतापर्यंत उपलब्ध करून दिलेला निधी | कामासाठी आतापर्यंत झालेला खर्च | काम पूर्ण करण्याचा दिनांक | काम पूर्ण झाल्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

जिल्हाधिकारी, हिंगोली तथा 'संनियंत्रण अधिकारी'
'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२'

## विवरणपत्र- ३ (आर्थिक उद्दिष्ट्ये)

| अ | | | ब | | |
|---|---|---|---|---|---|
| आराखड्यास प्रशासकीय मान्यतेचा दिनांक व त्यानुसार मंजूर आराखड्याची एकूण किंमत | आराखड्यासाठी आतापर्यंत एकूण वितरीत निधी | आराखड्यासाठी आतापर्यंत एकूण वितरीत निधीपैकी झालेला एकूण खर्च | आराखड्यासाठी सन २०२६-२७ मध्ये एकूण अर्थसंकल्पित तरतूद | आराखड्यासाठी सन २०२७-२८ मध्ये एकूण अर्थसंकल्पित तरतूद | आराखड्यासाठी सन २०२८-२९ मध्ये एकूण अर्थसंकल्पित तरतूद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

जिल्हाधिकारी, हिंगोली तथा 'संनियंत्रण अधिकारी'
'श्री क्षेत्र औंढा (नागनाथ) जि.हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा टप्पा-२'